स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव दि.८ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात १९ ते २८ डिसेंबर, २०२२ या कालावधीत होत असलेल्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीर – आव्हान २०२२ मध्ये महाराष्ट्रातील २३ विद्यापीठांमधील १ हजार रासेयो स्वयंसेवक सहभागी होणार आहेत.

राज्यपाल कार्यालयाकडून राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण शिबीराचे आयोजन दरवर्षी केले जात असते. कोरोनामुळे गेल्या दोन वर्षापासून हे शिबीर होवू शकले नव्हते. यंदा कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला या शिबीराचे यजमानपद प्राप्त झाले आहे. या शिबीराची जय्यत तयारी सुरू झाली असून २३ कृषी व अकृषी विद्यापीठे यात सहभागी होणार आहेत. यामध्ये मुंबई विद्यापीठ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड, संत गाडगेबाबा विद्यापीठ, अमरावती, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ नागपूर, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर, एसएनडीटी महिला विद्यापीठ, मुंबई, महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी, डॉ. पंजाबराव कृषी विद्यापीठ, अकोला, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक, महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेरे, कवी कुलगुरू कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक, महात्मा गांधी हिंदी विद्यापीठ, वर्धा, होमी भाभा राज्य विद्यापीठ, मुंबई आणि हैदराबाद सिंध राष्ट्रीय महाविद्यालयीन मंडळाचे विद्यापीठ, मुंबई अशा एकूण २३ विद्यापीठांचा समावेश आहे. यामध्ये ५८० विद्यार्थी व ४२० विद्यार्थिनी सहभागी होणार असून रा.से.यो.चे ३७ पुरुष व ३७ महिला कार्यक्रम अधिकारी देखील सहभागी होतील. अशी माहिती रा.से.यो.चे संचालक प्रा. सचिन नांद्रे यांनी दिली.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: ८ डिसेंबर, २०२२

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी